# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या प्रबंधाची रूपरेषा

**विषय**

**"डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांचा चिकित्सक अभ्यास"**

## संशोधक

श्री. इब्राहीम जमन तडवी
सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
पी. डी. कारखानीस कला व वाणिज्य महाविद्यालय,
अंबरनाथ, जि. ठाणे - ४२१ ५०१

## मार्गदर्शक

डॉ. एन. जी. अडकिणे
राज्यशास्त्र विभाग,
बी. जी. महाविद्यालय, उमरी, जि. नांदेड

**अभ्यासकाची सही** | **मार्गदर्शकाची सही**

**प्रस्तावना :-**

भारतात आधुनिकतेवर उभी असलेली सर्वंकष परिवर्तनाची प्रक्रिया ही १९ व्या शतकात सुरु होते. जातीबद्ध परिदृढ, आर्थिक उत्पादन हितसंबंध असलेली सरंजामी समाजव्यवस्था डळमळीत व्हायला याच काळात सुरुवात झाली. आधुनिकतेवर उभ्या असलेल्या वसाहतवादाने आपल्या मूल्यात्मक आणि संस्थात्मक परिघातून परिवर्तनाची प्रक्रिया भारतात सुरु केली. हा बदल परंपराप्रिय समाजात आकस्मिक हस्तक्षेप करणारा असल्यामुळे अस्तित्वात असलेली रूढ सामाजिक मुल्ये आणि संस्था सहजासहजी या नव्या व्यवस्थेशी जुळवून घेत नाही. परंपराप्रिय समाज या आधुनिक प्रगत बदलास विरोध करतो; तथापि नव्या आर्थिक गतीमानातेतून जुनी मुल्ये आधुनिक मूल्यांशी जुळवून घेत असतांना भारतीय समाजव्यवस्था बदलाच्या प्रवाहात हळुवार पणे गतिमान होताना दिसते. अशा प्रकारे भारतात हळुवारपने परंतु निश्चितपणे सर्वंकष परिवर्तनाची प्रक्रिया सुरु होते.

राज्यकर्त्यांच्या दीर्घकालीन वसाहतीक ध्येयधोरणांतून पाश्चात्य तत्वज्ञानात उच्च वर्ण जाती आणि मध्यमवर्गीय अभिजन वर्गाच्या झालेल्या प्रवेशामुळे त्यांनी धर्म चिकित्सेतून समाज सुधारणेची चळवळ हाती घेतली. एकोणिसाव्या शतकाच्या अखेर पर्यंत या दोनहीवर्गाने वसाहतीक प्रशासनाचा गाडा इमानेइतबारे पद्धतीने ओढला. २० व्या शतकाच्या सुरुवातीस उदयाला आलेल्या भांडवली वर्गाने प्रस्तुत मध्यमवर्गीयांच्या मदतीने वसाहतवादविरोधी लढा हाती धेऊन गतिमान करण्याच काम केल. टिळकांच्या आक्रमक राष्ट्रवादाने प्राचीन भारतीय संस्कृतीचे उदात्तीकरण करून एकीकडे सामाजिक परिवर्तनाला विरोध केला. याचे सुरुवातीचे नेतृत्व टिळकांनी केले तर नंतरचे नेतृत्व महात्मा गांधीनी केले. परिणामी प्रतिकूल सामाजिक-आर्थिक पर्यायाने राजकीय विषमतामूलक पर्यावरणात उदारमतवादी राज्यघटनेने हमी दिलेल्या सर्वच प्रकारच्या स्वातंत्र्यापासून व्यक्ती वंचित राहते; आणि शोषणास सहजच बळी पडते. या सैद्धांतिक सूत्रातून डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांचा तुलनात्मक अभ्यासाचा शोध घेण्याचीगरज आहे त्यातूनच संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

२० व्या शतकातील संविधानीक विकासाच्या प्रक्रियेत डॉ. आंबेडकराना अस्पृश्यतेचा प्रश्न महत्वाचा वाटतो राजकीय आणि सामाजिक हक्काच्या बाबतीत सुरुवातीला १९३० च्या दशकात गोलमेज परिषदेच्या माध्यमातून पुढे १९३५ च्या राज्यघटनेत आणि नंतर स्वतंत्र भारताच्या

राज्यघटनेत अस्पृशांच्या उन्नतीसाठी त्यांनी काही तरतुदी समाविष्ट केल्या. तथापि, या उदारमतवादी राज्यघटनेत अस्पृशांच्या दास्य विमोचनाची हमी नव्हती; फार तर भांडवलशाही विकासाच्या प्रक्रियेत आरक्षणातून अस्पृशांतील एक अल्पसंख्याक मध्यम वर्ग उदयाला येणार होता, या कारणामुळे डॉ. आंबेडकर अस्पृशांच्या सामाजिक-आर्थिक दास्यमुक्तीचा प्रश्न बहुजन शोषित जातीसमूहांच्या प्रश्नांशी जोडून डॉ. आंबेडकर वर्गविहीन जातीविहीन समाज गठीत करण्याचा प्रयत्न केला. भारतीय समाज वास्तवात जातीसंथेची पकड उदारमतवादात व्यक्तीला बंदिस्त करते आणि दुसऱ्या बाजूला राजकीय व्यवस्थेत मुलभूत अधिकारांच्या उपभोगास अपात्र ठरवते. यामुळे बौद्ध तत्वज्ञानात मानव मुक्तीचा मार्ग डॉ. आंबेडकर शोधतात. तथापि बौद्ध तत्वज्ञानात व्यक्तीच्या नैतिक चारित्र्य गठनाचे सैद्धांतिक प्रारूप अधिक असल्याने आधुनिक काळात भांडवली शोषणाचे सामाजिक व राजकीय प्रश्न बौद्ध तत्वज्ञान सोडवू शकत नाही. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध तत्वज्ञानाचा हिंदू धर्माला सामाजिक पातळीवर पर्यायी धर्मसंस्कृती म्हणून उभी केली.

परंपराप्रिय समाजात बदल होऊ घातले असतांना त्यात प्रामुख्याने दोन वर्ग अस्तित्वात येतात. एक अधिकारात्मक हितसंबंध असणारा वर्ग तर दुसरा त्या हितसंबंधात्मक वर्ग व्यवस्थेला बळी ठरणारा वर्ग म्हणजेच शोषित वर्ग. परिणामी प्रस्तापित समाजात हितसंबंध उपभोगणारा समाज हा होउ घातलेल्या बदलास प्रथमस्तरावर विरोध करतो. पर्यायाने बदलला विरोध करणारा हा वर्ग बहुसंखेने असतो तर बदल स्वीकारणारा वर्ग हा अल्पसंख्य असतो. म्हणून कुठलाही समाज हा परिवर्तनाच्या प्रारंभिक अवस्थेत परंपराप्रिय असतो त्या परंपरातुन पिढ्यान-पिढ्या प्रवाहित झालेले हितसंबंध ते सोडायला तयार नसतात. त्याला भारतीय समाजव्यवस्था ही अपवाद नाही. कालांतराने युरोपात जसा-जसा विज्ञानवाद पुढे आला तसा युरोपियन समाज बदलला सामोरे गेला नव्हे त्याने तो अंगिकारला देखील. याठीकाणी मात्र भारतीय समाज त्याला अपवाद ठरला कारण भारतीय समाज संस्कृतीची जी अनेक वैशिष्ट्ये आहे त्यातील एक वैशिष्ट्य म्हणजे स्तरीकृत जातीयरचना. त्यात अजून भर घालण्याच काम केलं ते या स्तरीकृत जातीय रचणेबरोबर समांतर उभ्या राहिलेल्या पितृसत्ताक-पुरुषसत्ताक पद्धतीची. या दोनही व्यवस्थांनी भारतीय उपखंडात शूद्रा-तिशूद्र याला समांतर संपूर्ण ‘स्त्री’ वर्गाचे हजारो वर्षापासून इमाने इतबारे पद्धतीने शोषणाची प्रक्रिया सुरु ठेवली आणि जगाच्या पाठीवर भारताची आगळी वेगळी अशी एक ओळख निर्माण केली.

कोणताही समाज जर परिवर्तनात्मक बदलाच्या सर्वांगीण उन्नतीस पोहचावयाचा असेल तर त्या समाजाच्या दोन प्रमुख अंगांचा विचार होणे क्रमप्राप्त आहे. एक त्याची ‘जगण्यातील

सामाजिक सक्षमता' आणि दोन 'राजकीय सामार्थ्यशक्ती'. या दोनही अंगांचा ज्या मानवी समूहात अंतर्भाव होतो नव्हे प्रतीष्ठापना होते तो समाज खऱ्या अर्थाने प्रगत जीवनमान जगण्यास लायक बनतो अथवा स्व आणि समाजहिताच्या चौकटीत जगल्याचा आनंद वा समाधान प्राप्त करू शकतो. निकोप समाजव्यवस्था जन्माला घालायची असेल तर त्या समाजाचे वैचारिक व वैज्ञानिक बुद्धीसामार्थ्य वाढवण्याची नितांत गरज असते. त्यातूनच आपल्याकडील मानवी जीवनाच्या इतिहासात बौद्धिक सामर्थ्य सिद्ध करणाऱ्यांनी समग्र मानवजातीला त्याच्या सामाजिक व राजनैतिक हक्क, अधिकार व जबाबदाऱ्यांचे आग्रही प्रतिपादन करून प्रत्यक्ष कृतीची जोड दिली व नवी व्यवस्था रुजू शकली- सारांश - मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी त्याच्या सभोवतालच्या मानवी पर्यावरणात प्रखर सामाजिक विचारांची पूरक, प्रेरक कृती अशी व्यवस्था उभी करावी लागेल आणि उभी केलेली ही व्यवस्था निरंतर टिकून राहण्यासाठी समांतर असे राजकीय हक्क व अधिकार असायल हवे हाच डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक तत्वज्ञानातील हा विचार व्यापक संशोधनाचा विषय निश्चितच आहे.

व्यक्तीच व्यक्तीहित आणि सामाजीक हित जर का साधावयाचे असेल तर या शोषित पिडीत समाज घटकांना सामाजिक व राजकीय हक्काच्या प्रवाहात आणल्या खेरीज गत्त्यंतर नाही या मध्यवर्ती डॉ. आंबेडकरांचा चिंतनाचा विषय राहिलेला आहे.

**संशोधन अभ्यास पद्धती :-**

वरील संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक, चिकित्सक, अन्वेषनात्मक साहित्य सर्वेक्षण या अभ्यास पद्धती वापरल्या जातील.

**संशोधन विषयाचे महत्व :-**

स्वतंत्र भारतात जाती संस्थ्येचा अंत वा बिमोड न करताच उदारमतवादी लोकशाही गठीत करण्यात आली. या नवीन व्यवस्थेत मुलभूत अशा सामाजिक - राजकीय आणि आर्थिक परिवर्तानाअभावी असह्य शोषणाचे आणि दु:ख दारिद्र्याचे प्रश्न निर्माण झाले. अशा परिस्थितीत शोषणविरहित आणि विवेकावर आरूढ असलेल्या समाज आणि राज्याच्या निर्मितीसाठी डॉ. आंबेडकरांचे सानाजिक आणि राजकीय तत्वज्ञान दिशादर्शक ठरेल. तसेच या भारत राष्ट्रातील वंचितांचे समग्र जीवन सर्वांगीण विकासाच्या सीमारेषेवर येण्यासाठी सामाजिक न्याय आणि राजकीय न्याय प्रस्थापित करून द्‌यावा लागेल. तरच या राष्ट्राची अखंडता आणि राष्ट्रीयता सुरक्षित राहील या हेतूने डॉ. आंबेडकर यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचावावे लागतील म्हणून

अशा विषयांची संशोधनातून मांडणी करून बुद्दीवादी व विवेकवादी विचारांची या देशाला नितांत गरज आहे, या हेतूने सादर विषय महत्वाचा ठरतो.

**संशोधनाची साधने :-**

प्रस्तुत पी. एचडी. विषयाच्या संशोधनात प्रबंधाच्या बांधणीसाठी सामाजशास्त्रीय संशोधन पद्धतीनुसार प्राथमिक साधने, दुय्यम साधनांबरोबर अहवाल, मासिके, वृत्तपत्रे, ग्रंथलेखन  यांच्या अवलोकनातून सबंधित विषयाच्या आवश्यकते नुसार वापर करून विश्लेषणाच्या चिकित्सक पातळीवर जे निष्कर्ष हाताशी लागतात त्याचा सबळ पुराव्यांच्या आधारे मिंमासा करून विषयाला पूर्णत्व आणण्याच्या दृष्टीने आणखी काही साधनांचा उपयोग करता आला तर तो केला जाईल.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) डॉ. बी. आर. आंबेडकरांचा उदारमतवादी शासन प्रणालीतील समाज विषयक व राज्यविषयक विचारसमजून घेणे.

२) डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या सामाजिक व राजकीय विचारांची वर्तमानात परिणामकारकता तपासून पाहणे.

३) डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक जडण-घडणीवर पडलेल्या विचारांचा व परिस्थितीचा अभ्यास करणे.

४) आंबेडकरी तत्वज्ञानातून समाज हित व देशहित समजून घेणे.

५) निकोप समाज व्यवस्थेसाठी व राजकीय व्यवस्थेसाठी आंबेडकरी विचारांची योग्यता स्पष्ट करणे.

६) डॉ. आंबेडकरांची समाज, राष्ट्र - राज्य संकल्पना समजून घेणे

**संशोधनाची व्याप्ती :-**

डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांचा चिकित्सक अभ्यास असा प्रबंधाचा विषय असल्याने साहजिकच सामाजिक आणि राजकीय परिघातील विचार केंद्रवर्ती मानून व्यक्ती व व्यक्ती समूहाच्या समग्र सामाजिक प्रतिष्ठा ह्या राजकीय विचार स्वातंत्र्याच्या अधिष्ठानातूनच जपल्या जातील हा डॉ. आंबेडकरांचा दृष्टीकोन महत्वाचा मानून सदर विषयाचे

संशोधन करणे अपेक्षित आहे त्यामुळे इतर समकालीन विचारधारांचा व व्यक्ती विचारांचा आवश्यक तिथे संदर्भ वापरला जाईल.

**संशोधन मर्यादा :-**

डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक व समाजवादी राजकीय विचारांचा अभ्यास याचाच फक्त आढावा संबंधित संशोधनात घेण्यात येणार आहे. तत्कालीन परिस्थितील इतर समविचारी व्यक्तीचा अथवा तत्कालीन विचारधारांचा सामाजिक व राजकीय विचारांचा चिकित्सक आढवा घेणे आवश्यक वाटले तर तो संदर्भ विचारात घेतला जाईल तरीही प्रबंध विषयाची मर्यादा ही डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय विचारांपुर्तीच मर्यादित ठेवण्यात आली आहे.

वरील विषयाच्या प्रबंध मांडणीत जर संदर्भयुक्त अशा विस्ताराची गरज भासल्यास विषयाला अनुसरून काही अंशी आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल.

**विषय प्रवेश आणि संशोधनाचा आराखडा :-**

**प्रकरण योजना :-**

**प्रकरण - १**

डॉ. आंबेडकर - जीवन परिचय, जडणघडन, त्यांच्या जीवनात आलेल्या प्रभावशाली व्यक्ती.

- प्रास्ताविक
- डॉ. आंबेडकर यांचा कौटुंबिक इतिहास.
- रामजी सपकाळ एक कर्तव्यदक्ष कुटुंबकर्ता.
- डॉ. आंबेडकरांची भावंडे व त्यांचा जन्म.
- शालेय जीवनातील डॉ. आंबेडकर आणि केळुस्कर गुरुजी.
- डॉ. आंबेडकरांच्या बालपणातील काही प्रभावशाली घटना आणि व्यक्ती.
- डॉ. आंबेडकरांचे सर्वोच्य शिक्षण.
- समारोप.

**प्रकरण - २**

समाज संज्ञा आणि संकल्पना, डॉ. आंबेडकरांची समाजविषयक संकल्पना, भारतीय सामाजीक रचनाविशेष.

- प्रास्ताविक.
- उच्च शिक्षणानंतर बडोदा संस्थानाची सेवा आणि अनुभव.
- शूद्रा-तिशूद्राप्रति असणारी प्रचलित धर्मव्यवस्थेची वागणूक.
- डॉ. आंबेडकर आणि तत्कालीन सामाजिक परिस्थिती.
- वसाहतीक काळ आणि हिंदू समाजव्यवस्था परिवर्तन.
- भारतीय सुधारणावादी चळवळी.
- समाजसुधारणा विषयक डॉ. आंबेडकरांची भूमिका.
- भारतीय सामाजिक राचनाविशेष.
- समारोप.

**प्रकरण - ३**

भारतातील राजकीय विचारप्रणाली उदय व विकास, डॉ. आंबेडकरांचा राजकीय विचार, स्वरूप विशेष.

- प्रास्ताविक.
- भारतीय राजकीय विचारप्रणालीचा उदय व विकास.
- डॉ. आंबेडकर पूर्व भारतीय राजकीय व्यवस्था.
- डॉ. आंबेडकरांची राजकीय संकल्पना व विचार.
    - सामाजिक स्वातंत्र्य
    - धार्मिक स्वातंत्र्य
    - राजकीय स्वातंत्र्य
- उदारमतवाद आणि समाजपरिवर्तन.
- डॉ. आंबेडकरांचा स्त्री उन्नतीविषयक विचार.
- सामाजिक सुधारणा अगोदर की राजकीय सुधारणा अगोदर एक पेच.
- १९३५ चा कायदा आणि राजकीय सुधारणा.
- डॉ. आंबेडकर आणि राष्ट्रनिष्ठा.
- समारोप.

**प्रकरण - ४**

डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीकोनातून सामजिक आणि राजकीय विचारांची चिकित्सक मीमांसा,

चिरंतन सामाजिक बैठकीवरच राजकीय विकासाचे अधिष्ठान.

- प्रास्ताविक.
- डॉ. आंबेडकरांचा गोलमेज परिषदामधील सहभाग.
- स्वतंत्र मतदार संघाची मागणी.
- पुणे करार.
- डॉ. आंबेडकरांच्या राजकीय संघटना/ दृष्टीकोन.
- भारतीय राज्यघटना आणि आंबेडकर.
- धर्मांतरापाठीमागील डॉ. आंबेडकरांची भूमिका.
- डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचाराची फलश्रुती.
- समारोप.

**प्रकरण - ५**

डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या सामाजिक व राजकीय विचारविश्व टिकविण्यासाठीचा कृती आराखडा.

- प्रास्ताविक.
- भारतातील सामाजिक/धार्मिक परिस्थितीवर त्यांनी केलेले ग्रंथलेखन.
- शोषित, वंचित, पददलीतांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी दिलेली भाषणे, घेतलेल्या परिषदा व त्यासंदर्भातील लेखन.
- डॉ. आंबेडकरांच्या पत्रकारितेतील विषय विवेचन.
- डॉ. आंबेडकरांनी उभ्याकेलेल्या शिक्षणसंस्था आणि परिणाम.
- लोकशाहीत शोषितांचे प्रतिनिधित्व राहण्यासाठी त्यांनी काढलेले पक्ष व संघटन व घटनादत्त आरक्षण.
- डॉ. आंबेडकरांचे राजकारण - राष्ट्रकारण आणि चारित्र्य.
- समारोप.

**प्रकरण - ६**

आधुनिक भारतीय समाज आणि राजकीय व्यवस्थेमधील डॉ. आंबेडकर यांचे योगदान.

- प्रास्ताविक.
- डॉ. आंबेडकरांचा आधुनिक भारताच्या समाजाचे प्रारूप.
- राज्यघटनेची प्रास्ताविका : एक आदर्श समाजराष्ट्राचे चित्र.
- भारतीय लोकशाही संकल्पना आणि डॉ. आंबेडकर.
- घटनादत्त सामाजिक व राजकीय आरक्षणापाठीमागील डॉ. आंबेडकरांचा दृष्टीकोन.
- डॉ. आंबेडकरांचे भारतीय राजकारणातील स्थान व योगदान.
- समारोप.

**प्रकरण - ७**

उपसंहार

**परिशिष्टे :-**

**संदर्भ सूची :**


१) डॉ. बी. आर. आंबेडकर, रायटिंग ॲण्ड स्पीचेस,खंड - १, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे.

२) डॉ. बी. आर. आंबेडकर, रायटिंग ॲण्ड स्पीचेस,खंड - ३, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे.

३) धनंजय कीर, डॉ.आंबेडकर : लाईफ ॲण्ड मिशन,पॉप्युलर प्रकाशन, बॉम्बे.

४) मा. फ. गांजरे, डॉ.बाबसाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड - ६, अशोक प्रकाशन, नागपूर.

५) शंकरराव खरात, (संपादित), डॉ.बाबसाहेब आंबेडकरांची पत्रे, ठोकळ प्रकाशन पुणे,

६) श्रीराम निकम, गांधी - आंबेडकर : अस्पृश्य मुक्ती संघर्ष, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई.

७) डॉ.बाबसाहेब आंबेडकर, जातीसंस्थेचे उच्चाटन (ॲनिहिलेशन ऑफ कास्ट) अनुवादित, वसंत मून, मनोविकास प्रकाशन, मुंबई.

८) डॉ.बाबसाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत, (१९२७ - १९२९) संपादक - वसंत मून, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई.

९) डॉ.बाबसाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी, नानकचंद रत्तू, भाषांतर - भास्कर लक्ष्मण भोळे, बाबा भांड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

१०) एम. डी. देशपांडे, डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई.

११) द्या पवार आणि संपादक मंडळ, डॉ.बाबसाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

१२) गोपाळ गुरू, डॉ.आंबेडकरांची राजकीय सत्ता संकल्पना व दलित मुक्तीचा प्रश्न (लेख) उपरोक्त.